महाराष्ट्र पोलीस

पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००

E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

## प्रेस नोट

दिनांक :- १६/०७/२०२३

## नाशिक ग्रामीण घटकातील जनतेच्या आपत्कालीन मदतीसाठी २७ नवीन दुचाकी वाहनांची रवानगी

डायल ११२ प्रकल्पाअंतर्गत नाशिक ग्रामीण पोलीस दलास प्राप्त झालेल्या एकूण २७ नवीन दुचाकी वाहनांना मा. श्री. सदानंद दाते, भापोसे, पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सदरची वाहने नागरीकांच्या सेवेसाठी रवाना करण्यात आली आहेत.

नाशिक ग्रामीण पोलीस घटकात एकूण ४० पोलीस स्टेशन, ०८ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये, तर अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण व मालेगाव विभाग अशी एकूण ५० कार्यालये व इतर शाखा कार्यरत आहेत. सुमारे साडेतीन हजार पोलीस अंमलदार व पोलीस अधिकारी कार्यरत असलेले जिल्हा ग्रामीण पोलीस दल सुमारे १५,००० चौरस किलोमीटर परिसरातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळत आहे.

राज्यातील नागरीकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलीस मदत एकाच टोल फ्री क्रमांकावर उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा-डायल ११२ प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत नागरीकांनी केलेली तक्रार प्रायमरी कॉल सेंटर अथवा सेकंडरी कॉल सेंटर याव्दारे नाशिक ग्रामीण घटकाच्या मुख्य नियंत्रण कक्षात प्राप्त होते. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर ती शीघ्रतेने घटनास्थळापासून सर्वात जवळ असलेल्या वाहनास (ERV - Emergency Response Vehicle) पुरविली जाते. कॉल करणा-या इसमाने मागितलेल्या मदतीनुसार असे वाहन तात्काळ घटनास्थळी रवाना होते व अडचणीत असलेल्या इसमास मदत पोहचविण्याचे काम करते.

नाशिक ग्रामीण घटकात माहे सप्टेंबर २०१९ पासून डायल ११२ प्रकल्प कार्यान्वित झाला असून सदर प्रकल्पाअंतर्गत नागरीकांच्या तक्रारींची शीघ्रतेने दखल घेण्यासाठी या घटकास आणखी वाहनांची गरज होती. सदरची बाब लक्षात घेवून मा. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून एकूण १२ होंडा शाईन दुचाकी वाहने व जिल्हा नियोजन समितीकडून एकूण १५ बजाज पल्सर दुचाकी वाहने नाशिक ग्रामीण घटकास प्राप्त झाली आहेत. सदर नवीन व सुसज्ज २७ दुचाकी वाहनांच्या उपलब्धतेमुळे नाशिक ग्रामीण पोलीसांना जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न हाताळण्यासोबतच तक्रारदारांचे कॉल स्वीकारुन त्यावर शीघ्रतेने कारवाई करण्यासाठी मोठी मदत होणार आहे. यासोबतच जिल्हयातील डायल ११२ वर येणा-या कॉलला लागणारा प्रतिसाद वेळ देखील कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले. याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार-कांगणे, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय श्री. नितीनकुमार गोकावे, पोलीस निरीक्षक मोटर परिवहन विभाग श्री. पंकज पवार, पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग श्री. गोकुळ पवार यांचेसह ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. आपत्कालीन परिस्थितीत नागरीकांनी डगमगून न जाता ११२ क्रमांकावर कॉल करून पोलीस मदत मागावी असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.